## रायगड जिल्हा परिषद,अलिबाग
## (सामान्य प्रशासन विभाग)

**कुंटेबाग, रायगड जिल्हा परिषद प्रशासकिय इमारत, अलिबाग,जि.रायगड पिनकोड-४०२२०१**
Email-bdoraigad@gmail.comदुरध्वनी क्र.०२१४१-२२२०८२

---

जाहिरात क्र.- ०४/२०२६

जिल्हा परिषद, रायगड खालील नमुद केलेली पदे मानधनी तत्वावर घेण्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| **मानधनी तत्वावर नेमाण्याच्या पदाचे नाव** | **पदांची संख्या** |
|---|---|
| **माहिती तंत्रज्ञान तंत्रज्ञ** | **०१** |
| **जनसंपर्क अधिकारी** | **०१** |
| **अर्ज सादर करण्याचे ठिकाण** | **सामान्य प्रशासन विभाग, रायगड जिल्हा परिषद, कुंटेबाग, प्रशासकिय इमारत,अलिबाग, जि. रायगड, पिनकोड- ४०२२०१**<br>**Email-bdoraigad@gmail.com**<br>**दुरध्वनी क्र.०२१४१-२२२०८२** |
| **अर्ज सादर करण्याचा कालावधी** | **दिनांक - ०५/०८/२०२६ ते १२/०८/२०२६ सार्वजनिक सुट्टी सोडुन कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत. (दि. १२/०८/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत ) प्रत्यक्ष अथवा पोष्टाने अर्ज पोहच करावेत.** |

**अटी व शर्ती -**

१. सदर पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणीक अर्हता व शर्ती अटींची साठी https://www.zpraigad.gov.in या संकेतस्थळवर उपलब्ध आहेत. सदर शैक्षणीक अर्हतेमध्ये आवश्यकतेनुसार बदलण्याचे अधिकार जिप कडे राखुन ठेवले आहेत.

२. जाहिरातीतील अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा तसेच सदरची जाहिरात कारण न देता रद्द करण्याचा तसेच प्राप्त अर्जानुसार नियुक्ती देणे अथवा नाकारणे चा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग यांच्याकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

(जालिंदर पठारे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग

जा.क्र. राजिप/साप्रवि/लेखा-२/ २९९८ /२०२६
रायगडजिल्हा परिषद,अलिबाग
दिनांक - ०४ /०८/२०२६
**प्रत - सुचना फलकावर प्रसिध्दीसाठी**

# माहिती तंत्रज्ञान तंत्रज्ञ नेमण्याच्या शर्ती व अटी

## पात्रता

१.उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातुन संगणक शाखेतील पदवी/पदवीका (B.E/B.TECH/MCA/MBA-IT / किंवा समकक्ष किमान ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२.शासनाच्या ई-ऑफिस, नेटवर्किंग, हार्डवेअर व सॉप्टवेअर,विषयक कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.

३.उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे नाव आवश्यक आहे.

## अनुभव

१. पात्रता मधील अट क्र.२ कडील कामांचा किमान ५ ते ७ वर्षाचा अनुभव असावा.

२. शासकीय कार्यालयातील IT सेवा ई-ऑफिस, DSC, ई-मेल,नेटवर्क,संगणक देखभाल यांचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

## कामाचे स्वरूप

१. ई -ऑफिस संदर्भातील सर्व तांत्रिक सहाय्य

२. संगणक, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरणे यांची देखभाल व दुरूस्ती बाबत माहिती असावी.

३. नेटवर्क, इंअरनेट व वायफाय समस्यांचे निराकरण

४. सरकारी ई-मेल, DSC, लॉगीन व वापरकर्ता नोंदणीस सहाय्य

५. आवश्यकतेनुसार सॉप्टवेअर स्थापना अद्ययावत करणे व बॅकअप घेणे

६. कार्यालयातील आयटी उपकरणांची नोंदवही व मालमत्ता नोंदवही अद्ययावत ठेवणे

७. वरीष्ठांनी वेळोवेळी दिलेली इतर आयटी संबधित कामे पार पाडणे

८. जिल्हा परिषदेच्या सर्व बैठकी/सभांसाठी विषयानुसार PPT तयार करून सादरीकरण करणे.

९. जिल्हा परिषद राबवात असलेल्या विकास कामांची माहिती जिल्हा परिषद बेबसाईट वर प्रसिध्द करून अद्यायावत ठेवणे.

## करार कालावधी

१.कराराचा कालावधी ११ महिने राहिल (किंवा कार्यालयाने निश्चित केलेला कालावधी. )

२.काम समाधानकारक असल्यास करार वाढविण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

## करार समाप्ती

१.समाधानकारक सेवा न दिल्यास किंवा शिस्तभंग केल्यास पुर्वसूचना न देता करार समाप्त करण्यात येऊ शकतो.

२.तंत्रज्ञाने सेवा सोडण्यापूर्वी किमान ३० दिवस लेखी सूचना देणे आवश्यक राहिल.

## उपस्थिती व कामकाज

१.कार्यालयीन वेळेत नियमित उपस्थिती बंधनकारक राहील.

२. आपत्कालीन परिस्थितीत सुट्टीच्या दिवशी अथवा कार्यालयीन वेळेनंतरही सेवा द्यावी लागेल.

३. कामकाजाचा दैनंदिन अहवाल संबधित अधिका-यास सादर करावा.

४. प्राप्त झालेल्या तक्रारींचे शक्य तितक्या कमी वेळेत निराकरण करणे आवश्यक राहील.

## गोपनीयता

१.कार्यालयातील सर्व माहिती गोपनीय ठेवणे बंधनकारक राहील.

२.कोणतीही माहिती तृतीय पक्षास देणे अथवा परवानगी शिवाय डेटा कॉपी करणे निषिध्द राहिल.

## मानधन

१ करारामध्ये नमुद केल्याप्रमाणे ठोक र.रू.५००००/- (पन्नास हजार मात्र ) .मानधन अदा करण्यात येईल.

२.शासन नियमानुसार लागु कर व इतर कपाती करण्यात येतील.(PT/IT)

## इतर अटी

१. नियुक्ती मुळे कोणत्याही प्रकारचा कायमस्वरूपी शासकीय सेवेचा हक्क प्राप्त होणार नाही.

२. सर्व IT उपकरणे व शासकीय मालमत्तेची जबाबदारी संबधित तंत्रज्ञाची राहील.

३. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र) राजिप यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कामकाज करावे लागेल.

५. आवश्यक असल्यास उमेदवारांची मुलाखत घेवून अंतिम निवड करण्यात येईल,तसे अर्जदारांस पत्राने कळविला जाईल.

६. अर्जदाराने अर्ज करण्याच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीव्दारे विहीत मुदतीत अर्ज सादर करावा.तसेच अर्जासोबत आवश्यकत्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडाव्यात

७. जाहिरातीतील अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा तसेच सदरची जाहिरात कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग यांच्याकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

## २.जनसंपर्क अधिकारी नेमण्याच्या शर्ती व अटी

१ **पात्रता**

(अ) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.

(ब) मान्यता प्राप्त विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम ५०टक्के पेक्षा अधिक टक्केवारीसह उत्तीर्ण होऊन पुर्ण केलेला असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

२ **अनुभव**

(अ) उमेदवाराने जिल्हांस्तरावरील "अ" व "ब" दर्जाच्या वृत्तपत्रामध्ये पाच वर्ष काम केल्याचा अनुभव असावा.

(ब) कोणत्याही संस्थेकडुन सामजिक कार्यकर्ता प्रशिक्षण घेऊन सामाजिक कार्यकर्ता म्हणुन समाजसेवेचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

३ जिल्हा परिषदेने ठरवून दिलेल्या मासिक मेहनताना रक्कम रू. २००००/-(अक्षरी र.रू. वीस हजार मात्र) प्रमाणे काम करणे अर्जदारास बंधनकारक राहिल.

४ नियुक्त अर्जदारास अदा केली जाणारी मासिक मेहनताना रक्कम ही कंत्राटी ११ महिन्यांसाठी स्वरूपाची असल्याने नियुक्त अर्जदारास नियमित जिल्हा परिषद कर्मचारी संबोधले जाणार नाही. सबब त्याला कोणत्याही प्रकारे आणि कोणत्याही वेळेस शासकीय सेवेत कायम करण्याबाबत दावा करता येणार नाही. तसेच कोणत्याही क्षणी त्याची नियुक्ती संपुष्टात आणण्याचा किंवा मुदतवाढ देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्याकडे राखुन ठेवण्यात आले आहेत.

५ अर्जदाराने अर्ज करण्याच्या सर्वसाधारण कार्यपध्दतीव्दारे विहीत मुदतीत अर्ज सादर करावा.तसेच अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडाव्यात.विहीत मुदतीत प्राप्त आणि शैक्षणिक अर्हता प्राप्त अशा पात्र अर्जदारांची आवश्यक असल्यास मुलाखत घेवून अंतिम निवड करण्यात येईल.

६. मुलाखतीचा दिनांक, वेळ आणि ठिकाण याबाबतचा तपशिल अर्जदारांस पत्राने कळविला जाईल.

७ जाहिरातीतील अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचा तसेच सदरची जाहिरात कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग यांच्याकडे राखुन ठेवण्यात आला आहे.

(जालंदर पठारे)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र)
रायगड जिल्हा परिषद, अलिबाग